# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १६/०७/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक १६/०७/२००४ रोजी सभा सुचना क्र. ०९ दि. १२/०७/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ७) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ८) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १०) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ११) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | सदस्य |
| १२) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १३) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, सभेला सुरूवात होण्यापूर्वी एकही इतिवृत्तांत ह्या सभेला आलेले नाही त्याचे कारण काय? आज चार इतिवृत्तांत झालेले आहे.

**मा. सभापती :-**

ह्या इलेक्शन कारणांमुळे त्यांना वेळ मिळाला नाही.

**शरद पाटील :-**

इलेक्शनच्या कारणांमुळे, पण आज चार इतिवृत्तांत झाले व साहेब, ह्याला आता महिना झाला.

**मा. सभापती :-**

जर पुढच्या सभेत इतिवृत्तांत आले नाही तर आपण सर्वांनी सभेतून उठून जावे.

**शरद पाटील :-**

चार इतिवृत्तांत बाकी आहे आणि आता आम्ही रिटायर्ड होत असल्यामुळे आपण आम्ही जे बोललो त्याचे इतिवृत्तांत आम्हाला मिळायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

त्यांचे असे म्हणणे आहे की, अधिका-यांनी आम्हाला ठराव दिलेले नाही.

**शरद पाटील :-**

आपण अधिका-यांना त्याचे कारण विचारा.

**मा. सभापती :-**

आपल्या कारकीर्दीत जेवढे विषय झाले आहेत ते इतिवृत्तांत सभेसमोर ठेवण्यात येईल.

**प्र. सचिव :-**

शेवटच्या सभेचे एक इतिवृत्तांत सोडून.

**शरद पाटील :-**

आम्हाला असा संशय यायला लागला की, सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे सांगत होते की, प्रोसिडिंगमध्ये सगळे बदली होणार आहे म्हणून आम्हाला संशय वाटायला लागले आहे. ते बोलले ते खरे आहे असे आम्हाला आता वाटते.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्याकरिता बाकी ठेवले का? त्याच्यात काही झोलझाल करायचे आहे का? कारण सर्व पॉसिबल आहे.

**मा. सभापती :-**

चार इतिवृत्तांत बाकी आहे ते पुढच्या सभेत ठेवायला सचिवांना सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला इतिवृत्तांत नव्हते हे आम्ही समजू शकलो आणि एकावेळेला आम्ही एवढे सर्व वाचत राहायचे आणि त्याचे किडया काढत राहायचे का? तुम्ही चार इतिवृत्तांत ठेवता त्यात वांदा नाही हवे असल्यास आपण पाच इतिवृत्तांत ठेवा, प्रश्न तो नाही. पण एकावेळी तुम्ही किती इतिवृत्तांत द्याल त्याचे काही बंधन आहे का, नाही. आपण एक इतिवृत्तांत देखील द्याल ती तुमची सोय आहे, पुढचे काय? आम्हाला शेवटच्या सभेपर्यंत आमच्या कार्यकालातील सगळया प्रोसिडिंग पाहिजेत.

**प्र. सचिव :-**

शेवटची सोडून.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे, शेवटची सोडून त्यात कोणता प्रश्नच निर्माण होत नाही.

**प्र. सचिव :-**

आपल्याला इतिवृत्तांत देण्यात येतील. मागची जी सभा झाली, ज्या सभेचे इतिवृत्तांत द्यायचे आहे त्या सभेचे ठराव मिळाले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपले प्रोसिडिंग किती पेन्डींग आहेत, त्याची तारीख सांगा.

**प्र. सचिव :-**

१७/६/०४ व २४/६/०४ रोजीचे इतिवृत्तांत.

**बी. एम. माळी :-**

सभापती महोदय, आश्वासने देऊन काम चालणार नाही. खात्याकडून अजून ठराव आले नाही त्याला सचिव देखील काय करतील? चार चार वेळा विभागाला सांगून झाले आहे. ठराव आल्याशिवाय ते इतिवृत्तांत देऊ शकत नाही. ह्याला जबाबदार कोण, तर खातेप्रमुख.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती महोदय, याबाबत आपण संबंधित खात्याला स्पष्ट निर्देश द्या.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव म्हणजे तुम्ही काय बोलता, आपल्याकडे जे ठराव झाले ते त्यांच्याकडून व्यवस्थित प्रिंटआऊट होऊन, सुधार सांगितले, बदल सांगितले जे ॲड सांगितले तसे होऊन ते तुमच्याकडे आलेले नाही. त्याला किती कालावधी गेला?

**शरद पाटील :-**

माळी साहेब सांगतात की, संबंधित विभागाकडून ठराव आले नाहीत तर ते ठराव वेळेवर का आले नाहीत याची सभापती साहेब आपण विचारणा करा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण बोललात की, इलेक्शनमध्ये हे बिझी होते. डिपार्टमेंटचा आणि इलेक्शनचा काय संबंध आहे? डिपार्टमेंटकडून एक-दिड महिन्यापासून ठराव प्रिंटआऊट होऊन येत नाही, ह्याच्यात इलेक्शनचा काही एक संबंध येत नाही. सचिव कार्यालयाची जर काय चुक असेल की, ठराव पाठवले आहेत पण सचिवांनी दिले नाही तर ती त्यांची चूक आहे. मनाळे साहेब प्रशासनाकडून उपायुक्त मुख्यालय म्हणून तुमच्याकडे चार्ज आहे तर त्यांना तुम्ही आदेश दिले पाहिजे. प्रत्येक डिपार्टमेंटकडे त्यांनी लेखी आदेश दिला पाहिजे की, चार दिवसामध्ये आम्हाला सगळे सादर करा.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सा़ो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, नगररचना विभागाकडून काल ठराव प्राप्त झालेले आहे पुढच्या सभेत आपल्याला इतिवृत्तांत देण्यात येईल, याची खबरदारी घेतली जाईल.

**अशोक पाटील :-**

उपायुक्त साहेब, संबंधित डिपार्टमेंटला आपण डी.ओ. द्या.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सा़ो.) :-**

ह्याच्यपुढे खबरदारी घेतली जाईल आता ठराव प्राप्त झालेले आहेत व येथून पुढे सूचना ही देण्यात येतील की, ठराव वेळेच्या वेळी प्राप्त करून नगरसचिव विभागाकडे देण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

इतिवृत्तांत न वाचता त्याला आम्ही मंजूरी दिली तर त्याच्यात काही चुकीचे असेल तर आपण काय बोलता, इतिवृत्तांला मंजूरी देताना आपण बघायला पाहिजे होते. इतिवृत्तांताला आपण जेव्हा सभागृहात मंजूरी देतो तर तुमचे लक्ष असले पाहिजे होते, हे मंजुर झाले त्यानुसारच होणार म्हणजे तुमचे इतिवृत्तांत फायनल, म्हणजे सगळे फायनल, हे बरोबर आहे ना! आपण एकाचवेळी पाच-सात इतिवृत्तांत धडाधड द्याल ते आम्ही सर्व वाचत राहायचे ते योग्य आहे का, सांगा?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सा़ो.) :-**

सभापती महोदय, दोन दोन इतिवृत्तांत दिले जाईल एकत्र चार-पाच इतिवृत्तांत देण्यात येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आता त्याला गत्यंतर नाही आणि शेवटच्या सभेपर्यंत आपण आम्हाला सर्व इतिवृत्तांत द्यायला पाहिजे.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सा़ो.) :-**

इतिवृत्तांत देणे बंधनकारक आहे आणि ते आपल्याला देण्यात येतील, शेवटच्या सभेचे इतिवृत्तांत सोडून.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, नगरसचिव आपण लक्षात घ्या की, इतिवृत्तांत शेवटच्या काळापर्यंत दिले पाहिजे, द्यायला पाहिजे हा विषय आहे. कारण की जे सदस्य ज्या समितीमध्ये असतील त्यांच्या ज्या सूचना आहेत व त्यांनी जे म्हणणे नमुद केलेले आहे, म्हणजे काय केले होते त्याची माहिती त्या सदस्यापर्यंत पोहचली पाहिजे. हा महत्वाचा विषय आहे. आपण जी प्रोसिडिंग व जे काही विषय आणतो ते सर्व विषय घ्यायचे अधिकार सभापतींचे आहेत की नगरसचिव ह्यांचे आहेत, की प्रशासनाचे आहेत.

**प्र. सचिव :-**

सभापतींचे आहेत.

**मोहन पाटील :-**

संपूर्ण विषय ठेवायचे अधिकार त्यांचे असतात आणि ते कोणते विषय ठेवायचे हा त्यांचा पूर्ण अधिकार आहे आणि अशा मागच्या काळामध्ये ब-याच वेळेला मा. महासभेमध्ये सहा-आठ महिन्याचे प्रासिडिंग एकत्र आलेले आहे पाच-पाच, सहा-सहा सभेचे. हे सर्वस्वी अधिकार त्या पिठासीन महापौर व समितीचे सभापती त्यांचे आहे का? आणि शेवटच्या क्षणापर्यंत प्रोसिडिंग दिली पाहिजे आणि त्याच्यात

काही दुमत नाही, द्यायला पाहिजे असे माझे म्हणणे आहे. परंतु ते अधिकार संपुर्णपणे सभापतींचे असतात असा तुम्ही खुलासा केला. एखाद्या विषयावर प्रोसिडिंग होते तर त्या प्रोसिडिंगच्या अभावी, प्रोसिडिंग मंजूरीच्या अभावी तुम्ही प्रशासकीय काम किंवा ठरावाची अंमलबजावणी ठेवता का? जर एखाद्या विषयाचा या सभेमध्ये ठराव झाला व त्याच्यानंतर त्याचे जे इम्प्लीमेंशन आहे तर त्या ठरावाचे इम्प्लीमेन्शन करताना आपण ते इतिवृत्तांत मंजूर करण्याची वाट पाहता का, की वाट न पाहता मंजूर करू शकता कीख करण्याचे आपल्याला कायद्याने क्रमप्राप्त आहे. त्याची माहिती द्यावी.

**प्र. सचिव :-**

दोन पद्धत आहे. एक ठराव वाचून जर आपण कायम केला तर त्याचे इम्प्लीमेंट ताबडतोब करता येते आणि दुसरे इतिवृत्तांत मंजूर झाल्यावर इम्प्लीमेंट करता येते.

**मोहन पाटील :-**

म्हणजे आपल्याला इतिवृत्तांताची आवश्यकता भासत नाही, ठरावाचे काम करायला. इतिवृत्तांत दिले पाहिजे आणि इतिवृत्तांत देताना सर्वस्वी जर अधिकार नगरसचिव आणि डिपार्टमेंटचे विषय घ्यायचे असते तर सन्मा. सदस्यांनी त्याचा खुलासा सभापती साहेबांकडून घ्यायला पाहिजे. सभापती साहेबांना देखील एखादा विषय क्रमप्राप्त घ्यायचा असेल तर ते सर्व अधिकारी सभापतींचे आहेत ही माहिती मला या सभागृहात द्यायची आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५६ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५६ :-**

माहे एप्रिल २००३ ते मार्च २००४ अखेरच्या वार्षिक लेख्यांस मंजुरी मिळणे बाबत.

**ठराव क्र. ६५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माहे एप्रिल २००३ त मार्च २००४ अखेरचे वार्षिक लेखे MAC 1971 Form No. 27 नुसार तयार करुन मुख्यलेखापरिक्षक ह्यांचेकडुन तपासणीकरुन घेण्यांत आलेल्या वार्षिक लेख्यास आजची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. अशोक पाटील.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५७ चे वाचन केले.)

**याकुब कुरेशी :-**

सध्याचा दर काय आहे?

**एस. के. दशोरे :-**

२३० रूपये.

**याकुब कुरेशी :-**

मग ते आपल्याला परवडत नाही का?

**शरद पाटील :-**

ते आपण पाण्यासकट देणार का पाण्याचे भरले आहे.

**एस. के. दशोरे :-**

पाणी आपणच देणार आहोत. त्यांना २७५ रूपये देणार.

**शरद पाटील :-**

वार्षिक खर्चातून १९४ देणार आहे का, आणि पाण्याचे पैसे आता किती द्यायचे आहे. आता ही आपण नागरिकांना जे टँकरने पाणी पाठवतो ते २७५ ने पाठवू टँकरसकट म्हणजे ह्यांचा रेट कमी झाला तरी २७५ रूपये आपल्याला लागेल.

**मा. सभापती :-**

आता आपण ह्याच्यावर कमी करू.

**शरद पाटील :-**

ह्यांचा रेट कमी केला तर आपण नागरिकांना कमी रेटने द्या.

**मा. सभापती :-**

गेल्यावर्षी २३० ला आले होते. तर ह्यावर्षी १९०, १९४, १९५ ला आलेले आहे. तर त्याने कमी केले तर जो फरक पडेल ते आपण ३५ रूपये नागरिकांना स्वस्त करून देऊ.

**एस. के. दशोरे :-**

ऑलरेडी २७५ रूपये आहे. आपण पाण्याच्या टाकीचे रेट वाढवले नाही. त्यामुळे २७५ रूपये बरोबर आहे.

**आसिफ शेख :-**

आपण त्यांच्याशी चर्चा करून सुसंवाद साधून घ्या.

**शरद पाटील :-**

आपण पहिल्या ठेकेदाराला रद्द केले आहे त्याचे आपण कारण सांगा. कारण त्यांनी माझ्या मते सर्वांना पत्र पाठविली आणि नगरपालिकेच्या पाण्यात भ्रष्टाचार अशी पेपरला बातमी उद्या येईल. त्यामुळे आपण सभेपुढे त्याचे व्हेरीफिकेशन करा ते बरे होईल.

**मा. सभापती :-**

१९५ रूपयाला मंजुरी देण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, त्यांना माहिती देऊ की, पहिल्या ठेकेदाराचा ठेका का रद्द करण्यात आला? त्यांनी आता पत्र पाठवले की, मी अजून दहा रूपये कमी करून देतो.

**एस. के. दशोरे :-**

त्यांनी जी कागदपत्र सादर केली त्यामध्ये अनुभवाचा दाखला नव्हता. मग त्यांना अनुभवाचा दाखला द्या म्हणून सांगितले होते. त्यांनी दोन दिवसांत देतो म्हणून सांगितले. जर त्यांनी आता दिले तर कॉन्ट्रॅक्टरची सहीचे दिले ते वॅलीड नाही आहे.

**प्रकरण क्र. ५७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेच्या कामाची दर निश्चितीची वार्षिक निविदा मंजुरी बाबत.

**ठराव क्र. ६६ :-**

दि. १६/६/२००४ रोजीच्या दै. 'सागर' व दै. 'सुरज प्रकाश' मध्ये प्रसिद्ध करण्यांत आलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे बाबत कामाच्या निविदा मागविण्यांत आलेल्या होत्या. दि. १/७/२००४ रोजी सदर निविदा उघडण्यांत आल्या. सदर निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | दर (प्रति फेरा) |
|---|---|---|
| १ | मे. ओम ट्रान्सपोर्ट कंपनी | १९४/- |
| २ | मे. सागर वॉटर सप्लायर्स | १९५/- |
| ३ | मे. जी. एम्. वॉटर सप्लायर्स | २१२/- |
| ४ | मे. एन. डी. वॉटर सप्लायर्स | २३४/- |
| ५ | मे. मारिया वॉटर सप्लायर्स | २३५/- |
| ६ | मे. शिवानी वॉटर सप्लायर्स | २६०/- |

उपरोक्त ठेकेदारांनी सादर केलेल्या निविदांच्या तुलनात्मक तक्ता पाहता मे. ओम ट्रान्सपोर्ट कंपनी यांच दर सर्वात कमी रु. १९४/- प्रति फेरा असे आहेत. तथापी सदर निविदाकाराने नियमानुसार आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. सदर कागदपत्रे दोन दिवसात सादर करणेबाबत त्यांना तांडी सुचना देण्यांत आलेली होती. तथापी उपरोक्त कागदपत्रे निविदाकाराने दोन दिवसात सादर केलेली नाहीत. यामुळे त्यांची निविदा मंजुर करता येणार नाही.

तुलनात्मक तक्त्यातील लघुत्तम निविदा क्र. २ ची निविदा मे. सागर वॉटर सप्लायर्स यांची असून त्यांनी सादर केलेले दर हे रु. १९५/- प्रति फेरा असे आहेत. सदर कंत्राटदारास निविदामधील

दरामध्ये चर्चा व वाटाघाटी करणे करीता बोलाविले असता त्यांनी रु. १९४/- प्रति फेरा या दराने टँकरने पाणी पुरवठा करणेंस लेखी संमती दर्शविलेली आहे. त्यांनी निविदा सुचनेतील सर्व शर्तीची पुर्तता केलेली असून टँकरने पाणी पुरवठा केल्याबाबत अनुभवाचा दाखला सादर केलेला आहे. सबब मे. सागर वॉटर सप्लायर्स यांचे दर वाजवी व रास्त असल्याने त्यांची निविदा मंजूर करणेस व सदर दराने देयक अदा करणेंस मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५८ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, हा विषय परत एकदा आणला आहे व त्यात मा. आयुक्त साहेबांनी किती तारखेला मंजुरी दिली आहे कारण मागच्या वेळेला जानेवारीमध्ये मंजुरी मिळालेले प्रकरण जुलैमध्ये आणले होते. ह्यात मंजुरीची तारीख टाकलेली नाही. एकूण बजेटमध्ये आपली ८० लाखाची तरतुद आहे, ही औषधे खरेदी करण्याकरिता किंवा जंतुनाशके. तर ही ८० लाखाची तरतुद आजच्या तारखेला किती खर्च झाली आहे आणि तुमच्याकडे हातरक्कम किती राहिली आहे, ह्याचा खुलासा ह्यात दिलेला नाही. फक्त खर्च होणारी रक्कम ह्यात दिलेली आहे. म्हणजे आमच्याकडे अंदाजित ह्या लोडला एवढे बाकी आहेत. त्याच्यातले आम्हाला चार लाख खर्च करायचे आहे किंवा पाच लाख खर्च करायचे आहे असे डिपार्टमेंट कुठेही बोलत नाही. औषधे खरेदी करण्याकरिता मंजूरी द्यायला आमचा विरोध नाही. पण मागच्या वेळेला असा प्रसंग आला होता जानेवारीची खरेदीची मंजूरी जुलै महिन्यात आली होती. ही मंजुरी घ्यायला घेतील. पण ह्याच्यात कुठेही उल्लेख आलेला नाही की, आयुक्तांनी आपल्याला कधी मंजुरी दिली आहे आणि मंजुरीची तारीख काय?

**जोजफ घोन्सालवीस :-**

ही सही कुणाची केळकर साहेबांची आहे, तर आता त्यांचा नगरपालिकेशी काही संबंध नाही.

**मा. सभापती :-**

हे जुने आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जुने असले तरी काय झाले? ह्यांच्यासहीने येऊ दे आणि ज्या व्यक्तीचा संबंध नाही त्याचे आजच्या तारखेला कसे पास करता येईल.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य समजा, आपण जर रिटायर्ड झालेले असलात आणि आपण येथे इतिवृत्तांत काही गोष्टी केल्या असतील व आपण नसताना ते इतिवृत्तांत येथे मंजुरीला आल्यानंतर आम्ही सांगणार की, त्या सदस्यांचा संबंधच नाही असे आपण सांगू शकतो का? आपण एखादा ठराव मा. महासभेमध्ये मांडला आणि आपण त्याला सूचक असला आणि न जाणो असे होऊ नये मी मजाकमध्ये बोलतो जर आपले काही झाले आणि तो विषय इतिवृत्तांताला मंजुरीला आला तर आम्हाला सांगावे लागेल की, हे त्यावेळी होते आणि त्यांनी तो ठराव मांडला होता आणि आता ते नाही आहेत तर आपण तो ठराव कॅन्सल करून टाका, असे होत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सध्याचे जे उपायुक्त आहेत त्यांची सही पाहिजे.

**मोहन पाटील :-**

साहेब, असे होत नाही. हे जे झाले आहे ते त्यांच्या कार्यकालामध्ये झाले आहे आणि तसे झाल्यानंतर दुसरे उपायुक्त सही कशी करतील?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

तत्कालिन उपायुक्त केळकर साहेबांनी सदर गोषवा-यावर तीन तारखेला सही केलेली आहे आणि मागची सभा झाली आठ तारखेला तर आठ तारखेला हा विषय घ्यायचा होता. सन्मा. केळकर साहेबांकडून सही होऊन ज्यावेळी हे प्रकरण नगरसचिव विभागाकडे गेले तोपर्यंत तीन तारखेला ऑलरेडी आठ तारखेचा अजेन्डा इश्यू झालेला होता त्यामुळे ह्या सभेला प्रकरण घेणे क्रमप्राप्त झाले होते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेबांची बदली कधी झाली?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

केळकर साहेबांची बदली पाच तारखेला झाली आणि ते पाच तारखे्ला संध्याकाळी रिलीव्ह झालेले आहे आणि तीन तारखेला त्यांनी सही करून दिलेले आहे आणि तीन तारखेला अजेंडा ऑलरेडी इश्यू झालेला होता त्याच्यानंतर हा गोषवारा नगरसचिव विभागाकडे गेला होता.

**मिलन म्हात्रे :-**

सगळ मान्य आहे. आपण १६/७/०४ ला पाठवले आणि १६/७/०४ ला आमच्या समितीसमोर प्रोड्यूस केले. भले त्यावेळेला असू दे आणि ह्यांनी जर विचारले असते की, तुमच्या सहीचा का? आता तुम्ही सोळा तारखेला सबमिट करता आणि मी म्हणत नाही त्यांनी सही केली असेल किंवा नाही ते सगळे खरे आहे. पण १६ तारखेला केळकर साहेबांच्या सहिचा प्रस्ताव आम्ही आज मंजूर केला. हा टेक्निकली मला बरोबर वाटत नाही.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

जरी विषय सोळा तारखेला आला तरी मागच्या बैठकीकरिता सही करून गोषवारा दिलेला होता.

**मिलन म्हात्रे :-**

हा इंटरनल पार्ट आहे. आपण असा खुलासा कधी करू नका. मी सोळा तारखेचे बोलतो, सोळा तारखेला केळकर साहेब रजेवर आहेत का, तुमच्या ड्युटीवर आहेत का? नाही आहेत. चार्जवर नाही तर त्यांची सही लागणार नाही. तुमचे जे काय असेल ते करा. १६/०७/०४ ला आजची सभा आहे आणि आम्हाला नोटीस कधी मिळाली १२/०७/०४. साहेबांनी चार्ज कधी सोडला?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

पाच तारखेला.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे सात दिवसानंतर हा अजेंडा बनला. आता हे नविन येताना तुमच्या ऑन ड्युटी उपायुक्त ऑफीसरची ह्याच्यावर सही पाहिजे.

**बी. एम. माळी :-**

सभापती साहेब, आपली ही जी गोषवा-याची पद्धत आहे तिच चुकीची आहे. हा गोषवारा स्थायी समितीवर द्यायला नको. गोषवारा देताना त्याच्यावर खातेचे नाव लिहायचे आणि केव्हा बनवला ते लिहायचे आणि ज्या खात्याने बनवले आहे त्यांच्या सहीसकट तारीख लिहायची. तर हा असा गोंधळ होणार नाही. असा गोषवारा देण्याकरिता आपण आदेश द्यावा.

**मा. सभापती :-**

यापुढे गोषवारा कधी बनतो त्याची तारीख त्या गोषवा-यावर आली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

जो मुळ प्रस्ताव आहे, तुम्ही फाईलला जो मुळ प्रस्ताव आणला आहे त्याच्यावर तुमची किंवा अन्य कोणी उपायुक्त ज्यांच्याकडे केळकर साहेबांचा चार्ज आहे त्यांची सही द्यायला तुम्ही आदेश करा. नाहीतर ह्याला आम्ही मंजूरी देणार नाही. दुरूस्ती करून आता ज्यांच्याकडे चार्ज आहे त्यांची मूळ प्रस्तावावर सही पाहिजे आणि आपण आम्हाला बजेटची तरतुद सांगितली नाही. राहिलेले बजेट किती आहे आणि आणि आयुक्त साहेबांनी ह्याची मंजुरी किती तारखेला दिली आहे.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

५/५/२००४ ला दिली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण काय लिहिले आहे, प्रस्ताव सादर केला ५/५/०४ ला आणि आयुक्त साहेब आपल्याकडे रजेवर कधी होते?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

आयुक्तांनी ५ मे, २००४ ला मंजूरी जरी दिली असली, तरी प्रत्यक्ष आपण खरेदी १४ मे,२००४ ला केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी जो प्रश्न विचारला तो अजून आपल्याला कळलाच नाही. तुम्ही आयुक्तांकडे प्रस्ताव सादर केला आहे असे म्हणता तर मंजुरी दिली आहे त्याची खाली तारीख नाही.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

प्रस्ताव सादर केला होता.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर माझा वाद नाही. आपण मंजूरी बोललात ना, तर खाली मंजूरीची तारीख द्या.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

सदर प्रस्तावास मा. आयुक्त साहेब ह्यांची मंजूरी घेऊन.

**मिलन म्हात्रे :-**

बघा, परत एकदा सांगतो, मागच्या वेळेला जेव्हा असा मुद्दा आला त्यावेळेला आमची मंजुरी द्यायला आम्ही तयार आहोत. पण डिपार्टमेंट मंजूरी घेऊन दोन दोन महिने प्रस्ताव पडून राहतात, आपण आम्हाला पंधरा दिवसामध्ये सादर केले पाहिजे. हा नियम आहे ना! म्हणून आपण मला तारीख द्या. मला आपण बाकीचे काही सांगू नका फक्त मंजूरीची तारीख काय आहे ते सांगा, की ह्या तारखेला मंजूरी दिली आणि हा प्रस्ताव आम्ही आणला आहे. उशिरा का झाले त्याचे स्पेसिफिक उत्तर द्या.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

५ मे, २००४ ला मा. आयुक्त साहेब ह्यांची मंजूरी मिळाली आहे. तथापि १४ मे, २००४ ला प्रत्यक्ष खरेदी झालेली आहे. त्याच्यानंतर त्याच्या रिसीट ज्या प्राप्त झालेल्या आहेत ते २१ तारखेला प्राप्त झाली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

२१ किती?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपआयुक्त सो.) :-**

२१ जुनला, रिसीट प्राप्त झाल्यानंतर आपण ३ तारखेला तत्कालीन उपायुक्त यांच्या मान्यतेने गोषवारा सादर केलेला आहे. अवलोकनार्थ, म्हणजे २१ ते ३ तारखेचा कालावधी धरला तर आपण हे पंधरा दिवसाच्या आत सादर केलेले आहे.

**मोहन पाटील :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५८ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. ६७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उघडी गटारे, पाण्याचे साचलेले डबके, शहरातील इमारतीच्या सेप्टी टँक मध्ये मलेरिया लारव्ही लायडस ऑईल अळी नाशक फवारणी करण्याकरीता आरोग्य विभागाने दि. ५/५/२००४ रोजी मा. आयुक्त यांची मंजुरी घेऊन मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ह्या भारत सरकारचा अंगिकृत व्यवसाय असलेल्या उत्पादीत कंपनी कडुन थेट २०००० लिटर दि. १४/५/२००४ रोजी खरेदी करण्यात आले आहे. या कामी रु. ४,९९,०३३.८० पैसे खर्च करण्यांत आले आहे. सदर खर्चास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

मलेरिया लारव्ही लायडस (एम.एल.ओ) ऑईलचा प्रस्ताव मा. स्थायी पुढे अवलोकनार्थ सादर केले असता हि सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५९ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

पाणीपुरवठा विभागातर्फे हा जो विषय आलेला आहे, प्रकरण क्र. ५९ त्यामध्ये अनुक्रमांक १ ते ८ ह्यामध्ये आमच्या प्रभागातील विशेषतः नेहरू नगर परिसरात वाढीव जलवाहिनी टाकणे, लाल बहादूर शास्त्रीनगर परिसरात वाढीव जलवाहिनी टाकणे ह्या दोघांचे एस्टीमेट ४,९९,८७३ यासह हा प्रस्ताव स्थायी समिती मंजूर करत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५९ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | मजूर संस्थेचे नांव |
|---|---|---|---|
| १ | नवघर जलकुंभा पासून ते बंगासंगा पर्यंत ६०० मी.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनीचे मजबुतीकरण करणे. | ४,७५,७५२/- | निळकंठ मंजूर कामगार सहकारी संस्था म. ठाणे. ठाणे |
| २ | भाईंदर (पू.) एकविरा गॅस गोडाउन जवळ नविन जलवाहिनी टाकणे. | २,७१,११८/- | रविकिरण मजूर कामगार सहकारी संस्था म. उल्हासनगर |
| ३ | नवघर रोड वरील ४०० मी.मी. व्यासाची मुख्य जलवाहीनीस कॉक्रीटींग करणे. | ४,९६,९३०/- | आंबिवली रास मजूर कामगार सहकारी संस्था म. शहापूर |
| ४ | जेसल पार्क येथील जलकुंभाची दुरुस्ती व इतर अनुषांगीक कामे करणे. | ३,६५,२९७/- | अंबिका मजूर कामगार सहकारी संस्था म. शहापूर |
| ५ | नवघर नाका ते स्नेहा हॉस्पीटल पर्यंतची ४०० मी.मी. व्यासाची मुख्य जलवाहीनी मजबुत करणे. | ४,९९,८७३/- | आंबिवली रास मजूर कामगार सहकारी संस्था म. शहापूर |
| ६ | राई गावांतील जलवाहीनी वाढविणे. | ४,९९,९८५/- | निळकंठ मजूर कामगार सहकारी संस्था म. ठाणे. ठाणे |
| ७ | मोर्वा गावातील अस्तित्वात असलेली जलवाहीनी वाढविणे. | २,६८,११५/- | सरजू मजूर कामगार सहकारी संस्था म. ठाणे. ठाणे |
| ८ | आर.एन.पी. पार्क ते जेसल पार्क पर्यंत मुख्य जलवाहीनीस कॉंक्रीटींग कव्हर देणे. | ४,९४,७६४/- | पुण्याई मजूर कामगार सहकारी संस्था म. ठाणे. ठाणे |

सबब उपरोक्त मजूर संस्थांच्या प्रस्तावांचे मा. स्थायी समितीने अवलोकन केलेले आहे.

**सुचक :- श्री. हरेश गावंड.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.०५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**